नि.फौ.ख.क्र. १६/२०२२
सरकार वि. धिरज
नि.क्र. ३१

सरकारतर्फे साक्षदार क्रमांक ४ यांची जबानी
मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो कि
नाव – महेश सोपान सुर्यवंशी,
वय – २२ वर्ष, व्यवसाय – मजुरी,
राह. – अंबाडी, तह. कुही, जिल्हा नागपुर.

**<u>सरतपास शपथेवर सरकारतर्फे शासकिय अभियोक्ता श्री.बी.एम.भगत द्वारा</u>**

१. मी न्यायालयात हजर आरोपींना ओळखत नाही. फिर्यादी देविदास कुंबले यांच्या घरी मी रोजमजुरीने काम केले असल्यामुळे त्यांना ओळखतो. घटना दोन वर्षापुर्वी दुपारच्या नंतर देविदास कुंबलेच्या घरी बाजार चौकात भुगाव येथे घडली होती. त्यावेळेस मी देविदास कुंबलेच्या मकानाच्या बांधकामाकरिता मजुरीने काम करीत होतो. घटनेच्यावेळेस त्याच्या घरी प्लास्टरचे काम सुरु असुन मी घराच्या आतमध्ये असल्यामुळे घटना काय घडली हे पाहीले नाही. तेथे जमलेल्या लोकांकडुन तेथे झगडा झाल्याचे मला माहीत पडले. त्याचा झगडा कोणासोबत झाला होता हे मला माहीत नाही. ज्यावेळेस मी देविदास कुंबलेच्या घरी कामाला होता त्यावेळेस त्याच्या बाजुच्या घरात देखील बांधकामाचे काम सुरु होते. सदर भांडणामध्ये कोणाला काय झाले हे मला माहीत नाही.

**साक्षीदार सर तपासात सहकार्य करीत नसल्याने सरकारी वकिलांनी साक्षीदारास उलट तपास सदृश प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली परवानगी देण्यात आली.**

२. मला हे आठवत नाही की देविदास कुंबलेच्या बाजुच्या घराचे पॅराफिट वॉलचे काम सुरु होते. मला हे माहीत नाही की सदर घर न्यायालयात हजर आरोपींचेच होते किंवा नाही. मला हे माहीत नाही की आरोपींनी त्यांच्या घराची पॅराफीट वॉलचे बांधकाम अर्धी विट जागेवर अनाधिकृतपणे कब्जा करुन केले होते. मला हे माहीत नाही की देविदास कुंबलेने त्यांना त्यांच्या जागेतच बांधकाम करायला सांगितले होते किंवा कसे. मला हे माहीत नाही की त्यावेळेस आरोपींनी वरुन विटा उचलुन देविदास कुंबलेवर फेकल्या होत्या आणि त्यामुळे त्याच्या डोक्यावर विट लागली होती. मला हे माहीत नाही की विट लागल्यामुळे त्याच्या डोक्यावर जखम होवुन रक्त निघाले होते. मला हे माहीत नाही की याच घटनेबद्दल देविदासने

पोलीसांकडे रिपोट दिला होता. आता मला माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचुन दाखविण्यात आला. सदर मजकुर मी पोलीसांना सांगितला नव्हता. त्यांनी माझ्या जबाबात तसे का लिहीले याचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींना चांगल्याप्रकारे ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की मी आरोपींना आज न्यायालयात आल्यानंतर भेटलो होतो. हे म्हणणे खरे नाही की त्यांनी कशाप्रकारे साक्ष द्यायची हे मला सांगितल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरुन मी आज खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपी वकिल श्री. एस.एस. राव यांच्यामार्फत – नाकारले.**

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत. समक्ष

मौदा.

दिनांक १२.११.२०२४ (ए.बी. कादियन )

न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी मौदा